10 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये पुस्तक परीक्षण उपक्रम संपन्न

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथे पुस्तक परीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या सामाज माध्यमाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनात रुची निर्माण करण्यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन अधिविभागात केले जाते.त्यांतर्गत मराठी ,हिंदी व इंग्रजी अशा विविध भाषांमधील,विविध साहित्य प्रकारचे समालोचन विद्यार्थ्यांना करावयास सांगितले जाते.त्याअंतर्गत अधिविभागात दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीलाल शुक्ल लिखित 'राग दरबारी' व लेखक आनंद यादव लिखित 'झोंबी' या पुस्तकांचे परीक्षण करण्यात आले. बी.एड .एम.एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी अनुताई सूरकर व अमृत मगदूम यांनी पुस्तकांचे परीक्षण केले.

याप्रसंगी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय कोल्हापूरचे प्राचार्य प्रा.डॉ.दत्तात्रय भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सूचना केल्या तर द न्यू कॉलेज शिवाजी पेठ, कोल्हापूर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.अर्चना कांबळे जगतकर यांनी 'पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या भाव भावनांशी नाते निर्माण करता आले पाहिजे'असे मत व्यक्त केले. यावेळी अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ.चेतना प्र.सोनकांबळे या होत्या. पुस्तक परीक्षणाची पार्श्वभूमी डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी मांडली.

10 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी ग्रंथांना गुरू करावे : वासुदेव कुलकर्णी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

जीवनात वाचनासारखा अन्य मोठा आनंद नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचते व्हावे, ग्रंथांना गुरू करावे, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व संपादक वासुदेव कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात आयोजित व्याख्यान आणि विशेष सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी पुस्तकप्रेमी समूहाचे प्रवर्तक कृष्णा दिवटे प्रमुख उपस्थित होते.



श्री. कुलकर्णी म्हणाले की, आजच्या काळामध्ये माणुसकी शिकविणारे शिक्षण घ्यायला हवे. त्याची नितांत गरज आहे. त्यासाठी माणसाने सतत शिकत रहावे. शिकण्याची जिद्द मनात ठेवून विद्यार्थ्यांनी ग्रंथांना गुरू केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या मातीशी जोडून राहिले पाहिजे. आपल्या भाषेचा अभिमान बाळगून वाचनसंस्कृती टिकविण्याचे काम आपणच केले पाहिजे.

या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक व्हाईट अन् ग्रे' आणि 'समाज आणि माध्यमं' या पुस्तकांना अनुक्रमे महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा ईश्वरपूर) आणि मारोतराव नारायणे प्रतिष्ठान, वर्धा या महाराष्ट्रातील नामांकित साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त झाले. त्याबद्दल त्यांचा श्री. कुलकर्णी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, भाग्यश्री प्रकाशनाच्या संचालिका भाग्यश्री कासोटे-पाटील यांचा प्रकाशन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. आलोक जत्राटकर म्हणाले, आजच्या काळातील प्रश्नांना विद्यार्थ्यांनी स्वच्छ हेतूने आणि निर्भयतेने भिडले पाहिजे. सभोवतालच्या विविध गोष्टींचे सूक्ष्म आकलन करून त्याविषयी आपण लिहीते राहिले पाहिजे. सतत वाचन, मनन, चिंतन केले पाहिजे.

भाग्यश्री कासोटे-पाटील यांनी आपल्या प्रकाशन वाटचालीमधील अनुभव कथन केले आणि विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या नव्या वाटा शोधून वाटचाल केली पाहिजे, असे सूचित केले. कृष्णा दिवटे यांनी आपल्या मनोगतामधून वाचन संस्कृती चळवळीविषयी अनुभवकथन करताना आजच्या काळात वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी मराठी अधिविभागातील एम.ए.भाग एकमधील मृण्मयी पांचाळ, विमल मोरे, संशोधक विद्यार्थिनी गौरी कुंभार यांचा विशेष प्राविण्याबद्दल सत्कार करण्यात आला.

अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

10 APR 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी काशीद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्षपदी दीपक नारायण काशीद यांची, तर उपाध्यक्षपदी राकेश आण्णासो डोंगरे यांची निवड करण्यात आली.



दीपक काशीद



राकेश डोंगरे

या दोन्ही निवडी बिनविरोध करण्यात आल्या. निवडणूक अधिकारी नीलेश दिनकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया राबवण्यात आली. या बैठकीला संचालक विजय पाटील, राजेंद्र चव्हाण, साताप्पा साळोखे, अनिल साळोखे, सचिन नाळे, विजय इंगवले, शशिकांत साळुंखे, सागर चौरे, विनय पाटील, सागर लांडे, सुरेश पाटील, शीतल सरनाईक, वंदना गुरव, चिटणीस नितीन लोहार व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 APR 2026

महा न्यूज & व्ह्यूज




# माणूस म्हणून मान्यतेसाठीच बाबासाहेबांकडून धम्मस्वीकार : प्रा. सुकुमार कांबळे


## शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाला प्रारंभ

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

माणूस म्हणून जगायचे असेल, तर बुद्धाच्या धम्माशिवाय पर्याय नाही. तसेच, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन आज प्रा. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

प्रा. सुकुमार कांबळे यांनी आपल्या व्याख्यानात धम्माचे मानवी मूल्य आणि सामाजिक परिवर्तनातील महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, प्राचीन काळातील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि विषमताधिष्ठित रचनेने समाजात माणसाला माणूस म्हणून मान्यता दिली नाही. हीच अन्यायकारक व्यवस्था पालटून टाकण्यासाठी बुद्धांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय हा मानवकल्याणाचा मार्ग दिला. सिद्धार्थ गौतम राजघराण्यात जन्माला आले असले तरी त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवत सत्य आणि मानवकल्याणाचा शोध घेतला. रोहिणी नदीच्या पाण्यावरून उद्भवलेल्या संघर्षाच्या वेळी त्यांनी युद्धाला विरोध करत शांततामय मार्गाचा आग्रह धरला. निसर्गाच्या संसाधनासाठी माणसाने माणसाचा जीव घेऊ नये, हा त्यांचा विचार पुढे बुद्धधम्माच्या तत्त्वज्ञानात दिसून येतो. सिद्धार्थांनी उपवास, तपश्चर्या आणि विविध तत्त्वज्ञानांचा अभ्यास व चिंतन करून शेवटी माणसाच्या दुःखाचे मूळ तृष्णा' असल्याचे सांगितले. अत्त दीप भव या संदेशातून त्यांनी प्रत्येकाला स्वतःच्या विवेकबुद्धीने विचार करून जीवन जगण्याचा मार्ग दिला.




ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता, अन्याय आणि विषमता अनुभवली होती. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिरप्रवेश या चळवळींच्या माध्यमातून त्यांनी मूलभूत मानवी हक्कांसाठी लढा दिला. यावेळी आलेल्या विदारक अनुभवातून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवण्यासाठी नव्या मार्गाची गरज असल्याच्या निष्कर्षापर्यंत ते आले. याच चिंतनातून १९५६ मध्ये त्यांनी बुद्धाचा धम्म स्वीकारला. हे केवळ धर्मांतर नव्हते, तर सामाजिक क्रांतीचा निर्णायक टप्पा होता. बुद्धधर्म हा विज्ञाननिष्ठ, तर्कसंगत आणि प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणारा आहे. अंधश्रद्धेला स्थान न देता विचारस्वातंत्र्य देतो. त्यामुळे आजच्या काळातही बुद्धधम्म मानवकल्याणासाठीचा अत्यंत उपयुक्त मार्ग आहे.

फुले-शाहू-आंबेडकर या त्रयीच्या विचारांचा एकात्म दृष्टिकोन मांडण्याची आज गरज असल्याचे अधोरेखित करताना अध्यक्षीय मनोगतात डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष कार्यातूनच महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांच्या परंपरा विकसनाला बळ लाभले असावे, असे अभ्यासांती माझे मत बनले आहे. शेतकरी हित, स्त्री सन्मान आणि शिक्षण या तीन प्रमुख आधारस्तंभांवर या सर्व महापुरुषांचे कार्य उभे असून, समाजपरिवर्तनाचा हा व्यापक वारसा समजून घेण्यासाठी त्यांच्या विचारकार्याचा तुकड्या-तुकड्यांत नव्हे, तर एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या आंबेडकरी संदेशाचा पाया शिक्षण' असून विद्यार्थ्यांनी विवेकनिष्ठ, चिकित्सक आणि स्वविचारक्षम बनण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अविनाश भाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2026
तरुण भारत

अँकर चंदीगड विद्यापीठ उपविजेते : शिवाजी विद्यापीठास दोन पदके, सांगली येथे पारितोषिक वितरण

# कॅनॉईंग, कयाकिंग स्पर्धेत गुरूनानक देव विद्यापीठ विजेते

त.भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने विजेतेपदावर नाव कोरले. स्पर्धेत चुरशीची लढत देणाऱ्या मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने उपविजेतेपद मिळविले आणि चंदीगडच्या पंजाब विद्यापीठास तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले. त्यांनी अनुक्रमे एकूण १८ व १५ पदके प्राप्त केली.



सांगली येथील रॉयल कृष्णा बोट क्लब येथे आज या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ खासदार विशाल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाला.

अमृतसरच्या गुरूनानक देव विद्यापीठाने स्पर्धेच्या सुरवातीपासून सर्वच गटांत आपले वर्चस्व कायम राखले. स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि सर्वांगीण कामगिरीच्या जोरावर एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य अशी एकूण १९ पदकांची कमाई करत त्यांनी अजिंक्यपद पटकावले. मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने ६ सुवर्ण, ६ रौप्य व ६ कांस्य अशी एकूण १८ पदके प्राप्त करीत उपविजेतेपद मिळविले. चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाने ७ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशा एकूण १५ पदकांसह तृतीय स्थान पटकावले.

स्पर्धेत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने २ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य अशी ८ पदके प्राप्त करीत चौथे, पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १ सुवर्ण ४ रौप्य व १ कांस्य अशी ६ पदके मिळवित पाचवे स्थान प्राप्त केले. गुरू काशी विद्यापीठ, केरळ विद्यापीठ यांनी प्रत्येकी ४, पुण्याचे भारती अभिमत विद्यापीठ, मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी प्रत्येकी ३ पदके प्राप्त केली. यावेळी खासदार विशाल पाटील यांनी महाराष्ट्रात या स्पर्धा प्रथमच भरविण्याचा सन्मान विद्यापीठाला मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिसभा सदस्य विशाल गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, पुण्याच्या युवक सेना संचालनालयाचे उपसंचालक सुहास पाटील, सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, डॉ. रामचंद्र पवार, सिद्धार्थ शिंदे, धैर्यशील यादव, संजय परमणे, काव्याश्री नलवडे, श्वेता परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, आनंद खामकर, पंच प्रतिनिधी मुकेश शर्मा, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. किरण पाटील, डॉ. मयूर सिंहासने, डॉ. कांबळे, डॉ. धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

चितळे उद्योगतर्फे क्रीडापटूंना भेटवस्तू देण्यात आल्या. तत्पूर्वी आज झालेल्या २०० मीटर शर्यतींमध्ये पुरुष गटात चंदीगड विद्यापीठ, भारती विद्यापीठ, गुरू नानक देव विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे, तर महिला गटात चंदीगड विद्यापीठ आणि गुरू नानक देव विद्यापीठ या संघांचे वर्चस्व दिसून आले.

## अखेरच्या दिवशी विद्यापीठाचा उत्कृष्ट खेळ

**दरम्यान, गेले चार दिवस विविध गटांत चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी आज अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत आपला खेळ उंचावत दोन पदके प्राप्त केली. पुरूषांच्या कयाकिंगमध्ये के-४ गटात रौप्य आणि महिलांच्या कॅनॉईंगमध्ये सी-२ गटात कांस्य पदक पटकावले. महिलांच्या के-४ गटातही चौथे स्थान प्राप्त केले.**

10 APR 2026
तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी ग्रंथांना गुरू करावे

■ वासुदेव कुलकर्णी यांचे प्रतिपादन

■ शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभागात सत्कार

। त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** जीवनात वाचनासारखा अन्य मोठा आनंद नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचते व्हावे, ग्रंथांना गुरू करावे, असे प्रतिपादन पत्रकार वासुदेव कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात आयोजित व्याख्यान आणि विशेष सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी पुस्तकप्रेमी समूहाचे प्रवर्तक कृष्णा दिवटे प्रमुख उपस्थित होते.


वासुदेव कुलकर्णी

या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक व्हाईट अन् ग्रे" आणि 'समाज आणि माध्यमं" या पुस्तकांना अनुक्रमे महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा ईश्वरपूर) आणि मारोतराव नारायणे प्रतिष्ठान, वर्धा या महाराष्ट्रातील नामांकित साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त झाले. त्यांबद्दल त्यांचा कुलकर्णी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, भाग्यश्री प्रकाशनाच्या संचालिका भाग्यश्री कासोटे-पाटील यांचा प्रकाशन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

मराठी अधिविभागातील एम.ए.भाग एकमधील मृण्मयी पांचाल, विमल मोरे, संशोधक विद्यार्थिनी गौरी कुंभार यांचा विशेष प्राविण्याबद्दल सत्कार करण्यात आला. अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

10 APR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे शुक्रवारी (दि.१०) फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास सुरुवात होणार आहे.

शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता सप्ताहाचे उद्घाटन होईल. याप्रसंगी प्रा. सुकुमार कांबळे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन या विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ सकाळी १०.३० वाजता प्राचार्य जी. पी. माळी यांच महात्मा जोतीबा फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म या विषयावर व्याख्यान होईल. रविवारी सकाळी १०.३० वाजता शिववार्ता यूट्यूब वाहिनीवर प्रा. रमेश जाधव यांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य या विषयावर व्याख्यान होईल. दि. १३ रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात डॉ. प्रकाश कांबळे लिखित वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथावर परिसंवाद होणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता गायक कबीर नाईकनवरे यांचा सलाम संविधान हा कार्यक्रम होईल.

दि. १४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा मुख्य कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

10 APR 2026

सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांकडून पुस्तकांचे परीक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात पुस्तक परीक्षण उपक्रम राबविण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषांमधील, विविध साहित्य प्रकारचे समालोचन केले. लेखक श्रीलाल शुक्ल लिखित 'राग दरबारी', आनंद यादव लिखित 'झोंबी' या पुस्तकांचे परीक्षण केले. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे होत्या. बी.एड .एम. एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी अनु सूरकर, अमृत मगदूम यांनी पुस्तकांचे परीक्षण केले. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय भोसले यांनी मार्गदर्शन केले. न्यू कॉलेजमधील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कांबळे-जगतकर म्हणाल्या 'पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या भाव -भावनांशी नाते निर्माण करता आले पाहिजे,' असे मत व्यक्त केले. पुस्तक परीक्षणाची पार्श्वभूमी डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी मांडली. ईश्वर पडवी यांनी सूत्रसंचालन केले. संजना भालकर यांनी आभार मानले.